नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/12/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## बुट्टीबोरी येथे सिगारेटची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## एकूण ११,२१,१७५/—रू. चे मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई

पोलीस स्टेशन बुट्टीबोरी अंतर्गत दिनांक ३०/१२/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपुर उपविभागात अवैध धंद्यांवर आळा घालणे संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस ठाणे बुट्टीबोरी हद्दीतील धवडपेठ येथे चार चाकी वाहन संशयितरीत्या येतांना दिसले. सदर वाहन चालकास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने थांबण्याचा इशारा केला असता सदर वाहनात आरोपी मारुती ओमनी कार क्र. TN-51/E-5135 चा चालक (फरार) हा आपले वाहन न थांबवता घटनास्थळावरून वाहन सोडुन पळु लागला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी चालकाचा पाठलाग केला असता अंधाराचा फायदा घेवुन जंगली झुडपात पळुन गेला. घटनास्थळाहुन १) एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये American Club कंपनीचे सिगारेटचे ९४० सिलबंद पॅकेट प्रत्येकी १२०/—रु प्रमाणे एकूण १,१२,८००/—रु २) एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये Gold Flake Premium कंपनीचे सिगारेटचे १२०० सिलबंद पॅकेट प्रत्येकी ९५/—रु प्रमाणे एकूण १,१४,०००/—रु ३) एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये Gold Flake Premium कंपनीचे सिगारेटचे १२०० सिलबंद पॅकेट प्रत्येकी ९५/—रु प्रमाणे एकूण १,१४,०००/—रु ४) एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये Gold Flake Premium कंपनीचे सिगारेट चे ११५० सिलबंद पॅकेट प्रत्येकी ९५/—रु प्रमाणे एकूण १,०९,२५०/—रु ५) एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये Gold Flake Premium कंपनीचे सिगारेटचे १२०० सिलबंद पॅकेट प्रत्येकी ९५/—रु प्रमाणे एकूण १,१४,०००/—रु. ६) एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये Gold Flake Smart कंपनीचे सिगारेटचे ४७५ सिलबंद पॅकेट प्रत्येकी ९५/—रु प्रमाणे एकूण ४५,१२५/—रु. ७) एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये Gold Flake Premium कंपनीचे सिगारेटचे १२०० सिलबंद पॅकेट प्रत्येकी ९५/—रु प्रमाणे एकूण १,१४,०००/—रु ८) एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये Gold Flake Premium कंपनीचे सिगारेटचे १२०० सिलबंद पॅकेट प्रत्येकी ९५/—रु प्रमाणे एकूण १,१४,०००/—रु ९) एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये ब्रिस्टॉल कंपनीचे सिगारेटचे १२०० सिलबंद पॅकेट प्रत्येकी ७०/—रु प्रमाणे एकूण ८४,०००/—रु १०) मारुती ओमनी कार क्र. TN-51/E-5135 किंमती २,००,०००/—रु असा एकूण ११,२१,१७५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे बुट्टीबोरी येथे कलम ४१(१)(ड) जा.फौ. अन्वये इस्तागासा दाखल करण्यात आला असून संबंधित कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई नागपुर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक डॉ. श्री. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशीष मोरखडे, सहायक फौजदार महेश जाधव, पोलीस हवालदार अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, मिलिंद नांदुरकर, मयूर ढेकळे, पोलीस नायक अमृत किनगे, रोहन डाखोरे यांचे पथकाने केली आहे.




## अवैध रेती चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन खापरखेडा यांची कार्यवाही

दिनांक ३०/१२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहीती मिळाली की, काही इसम हे वारेगाव शिवारातील कन्हान नदीचे पात्रातुन आपले ताब्यातील बोलेरो पिकअप गाडीने रेती चोरीचा प्रयत्न करीत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून नमुद घटनास्थळी पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ वाहन ताब्यात घेण्याकरीता गेले असता दोन्ही बोलेरो पिकअप वाहन पळून गेले. खापरखेडा पोलीसांनी वाहनाचा पाठलाग करुन **आरोपी क्र. १) कुणाल सिद्धार्थ मेश्राम वय २५ वर्षे, राहणार वारेगाव वार्ड नंबर एक तहसील कामठी २)** फरार पिकू यादव रा. वारेगाव हे अवैधरीत्या रेती चोरीचा प्रयत्न करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून बोलेरो पिकअप गाडी क्र. MH-40/CD-5838 अंदाजे किंमती ५,००,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपी २) पप्पु यादव हा आपल्या ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी घेवुन पसार झाल्याने सदर आरोपी क्र. ०१) व फरार आरोपी क्र. ०२) यांचेविरूद्ध पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अप क्र. ७५३/२०२३ कलम ३७९, ३४, ५११ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन खापा यांची कार्यवाही

दिनांक २९/१२/२०२३ चे रात्री १०.०० वा. दरम्यान जवाहर हायस्कुल खापा येथे पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ पेट्रोलींग करीत असता यातील आरोपी नामे – १) बबलू रामदास राउत, वय २६ वर्षे, रा. आवतेघाट ता. पारशिवनी जि. नागपूर २) अतूल सुरेश भूते, वय ३३ वर्षे, रा. खापा ३) चैतराम वसंत उईके, रा. ढकारा यांनी संगणमत करून, ट्रक मालक **आरोपी नामे– मिलिंद गागाटे, वय ४५ वर्षे, रा. खापा** याचे सांगणेवरून रामडोंगरी रेती घाट येथून अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून १५,००,०००/– रूपये किंमतीचा ट्रक क्र. एम. एच–३१/सी. क्यु–१०९७ मध्ये १२,०००/– रूपये किंमतीची ०४ ब्रास रेती भरून आणून, ती जवाहर हायस्कूल, खापा येथे ०८. ३० वा. सुमारास आणून खाली केली. आरोपीतांविरूद्ध भादंवि कलम ३७९, १०९, ३४ सहकलम महसूल अधिनियम कलम ४८(८) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत विशेष पथकाची कामगिरी

दिनांक २९/१२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ अवैध्य धंदयावर कार्यवाही करणेकामी पो.स्टे. सावनेर परीसरात पेट्रोलींग करीता फिरत असतांना विश्वसनीय मुखबीरद्वारे खबर मिळाली की, मौजा टाकली शिवार येथे आरोपी हा विनापरवाना कोलार नदीतुन ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये रेती भरून चोरी करीत आहे. अशी माहीती मिळताच पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ यांनी मौजा टाकळी येथे नाकाबंदी करून **चालक आरोपी नामे–१) निलेश दयाराम धुर्वे, वय २८ वर्ष, रा. माळेगाव ता. सावनेर** यास विचारपुस केली असता त्याने कोणत्याही प्रकारची रॉयल्टी न दाखवल्याने त्यांच्या ताब्यातून १) बिना नंबरचे ट्रॅक्टर ज्याचा चेसिस क्र. डी आय ०५५२४२० किंमती ५०००००/–रू २) अंदाजे ०१ ब्रास काळी रेती २०००/–रू चा मुद्देमाल एकुण ५०२०००/–रू मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन ट्रॅक्टर ट्रॉलीचा मालक **२) फरार आरोपी नामे –सागर बंड** यांचा सांगण्यावरून आरोपी ट्रॅक्टर ट्रॉलीचा चालक हा अवैध्यरित्या विनापरवाना ट्रॅक्टर ट्रॉली रेती मध्ये भरून वाहतुक करित असतांना मिळुन आल्याने आरोपीतांविरूद्ध कलम ३७९ भादवी. सहकलम ४८ (८) महाराष्ट्र महसुल अधिनियम १९६६ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्र. ०१) याला अटक करण्यात आली असुन आरोपी क्र. २) याचा शोध घेणे सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात पोलीस अधिक्षक विशेष पथक नागपुर ग्रामीणचे पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोलीस हवालदार हरीदास चाचरकर, पोशि गोरख निंबार्ते, अतुल बांते यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर